# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं. -४०१ ३०५

दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स -0250-2525107

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** २९४

**विभाग :- मालमत्ता कर**

**दिनांक :- २९/०६/२०२१**

**विषय :- महाराष्ट्र (मोठया निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनीयमीत केलेला) अधिनीयम( MTOB),१९७९ नुसार कर आकारणी करणे व तो वसुल करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी नगरपरिषदा व ग्रामपंचायतमध्ये वेगवेगळया करयोगय मूल्यानुसार मालमत्ताकराची आकारणी करण्यात येत होती. महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९-अ नुसार कर समानीकरण करण्याची प्रक्रीया सन २०१७-१८ साली सुरु करण्यात आली. सदर समानीकरणाची प्रक्रीया सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पूर्ण झालेली आहे.

महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ हा संपूर्ण महाराष्ट्रात दि.१२ सप्टेंबर १९७९ साली लागु करण्यात आला. या अधिनियमानुसार महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रु.१५०० पेक्षा अधिक असेल अशा मालमत्तांच्या करयोग्य मूल्यावर १०% कर लागू करण्याबाबत तरतूद देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.१ नुसार सन २००९ ते २०१७ व २०१७-१८ या वित्तीय वर्षांकरीता महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार केंद्रशासनाच्या लेखापरिक्षण विभागाने मनपाच्या मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षण केलेले असुन त्याची आक्षेपाची प्रत दि. २७/०३/२०१९ रोजी या कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहे. सदर आक्षेपानुसार महानगरपालिकेने महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार कर लागू करणे व तो वसुल करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची होती. असे असतानाही महानगरपालिका स्थापना झाल्यापासून अशा कराची आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या लेखा परिक्षण विभागात सन २००९ ते २०१७ या कालावधीत लेखा परिक्षण करताना रक्कम रु.३,९१,८६,०६१/-

इतक्या रक्कमेचा शासनाच्या कराचे नुकसान झालेले आहे असा आक्षेप नोंदविलेला आहे.

उक्त बाबी लक्षात घेऊन सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ अन्वये कर लागु करणेबाबत मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मालमत्ता कर समानीकरणाची प्रक्रीया सुरु असल्याने सदरचा कर लागु करणेबाबत मा. सर्वसाधरण सभेने संदर्भ क्र.२ नुसार सदर प्रस्तावास स्थगीती देवुन कर समानीकरणाची प्रक्रीया पुर्ण झाल्यावर महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग (MTOB) नुसार कर लागु करण्यात येईल. असा दि. २०/०६/२०१९ रोजी ठराव पारीत केला.

महानगरपालिका हद्दीतील समानीकरणाची प्रक्रीया ही सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात पुर्ण झालेली आहे. मा. राज्यशासनाकडून संदर्भ क्र. २,३ व ४ नुसार महानगरपालिकेस वारंवार महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग नुसार केलेल्या कर आकारणीचा अहवाल मागविण्यात येत आहे. व सदर करातून प्राप्त होणारे उत्पन्न राज्य शासनास वळते करणेबाबत निर्देशीत करण्यात येत आहे. सदर कराची अपेक्षीत रक्कम संबंधीतांना लागु करुन त्यांच्याकडुन वसुल करुन घेऊन वसुल करण्यात आलेली रक्कम मा. राज्यशासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ चे कलम १५ अन्वये सदरची रक्कम पालीकेच्या बँकेत असलेल्या खात्यातुन परस्पर वळती करुन घेण्याची तरतुद नमुद आहे. सदर बाबींचा विचार करता शहरात महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार तसे न केल्यास कलम १५ अन्वये सदरची रक्कम पालिकेच्या बँकेत असलेल्या खात्यातून परस्पर वळती करुन घेण्याची तरतूद नमूद आहे.

सदर बाबीचा विचार करता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत उक्त कर लागू करणे व वसुल करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींनवरील कर (पुन्हा अधिनियमीत केलेला) अधिनियम, १९७९ नुसार करपात्र मालमत्तांची माहिती खालील प्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिका हद्दीतील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रू.१५०० पेक्षा अधिक असेल अशा मालमत्तांची संख्या | ४६९९ |
| २. | करयोग्य मूल्यावर १०% रक्कम | रू.१,१४,२९,४१७/- |

कर आकारणी न केल्यास प्रतीवर्षी आक्षेपानूसार रक्कमेत वाढ होवून शासन पालिकेच्या तिजोरीतून सदरची रक्कम वळती करुन घेतल्यास पालिकेचे

करोडो रूपयांचे आर्थिक नुकसान होईल. याचा परिणाम पालिकेच्या विकास कामांवर होईल. करीता शहरातील ज्या मालमत्तांचे तळक्षेत्र १५० चौ.मी पेक्षा अधिक असेल आणि तीचे करयोग्य मूल्य रू.१५०० पेक्षा अधिक असेल अशा इतारतींवर करयोग्य मुल्याच्या १०% कर लागू करणे व वसुल करणे करिता मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :-** महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारतींवरील कर (पुन्हा अधिनीयमीत केलेल्या) अधिनीयम (MTOB),१९७९ नुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ज्या निवासी मालमत्तेचे तळक्षेत्र १५० चौरस मिटर पेक्षा अधिक असेल आणि तिचे कर योग्य मूल्य पंधराशे रूपयांपेक्षा अधिक असेल अशा मालमत्तेच्या करयोग्य मुल्याच्या १०% कर सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासुन लागु करणे व तो वसुल करणेबाबतची प्रशासकीय मंजुरी देणेत येत आहे.

**प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**